# खारघर टोलनाका विरोधातील आंदोलन
# पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीसह
# विविध संस्था-संघटनांचा आमदार प्रशांत ठाकूर यांना जाहीर पाठिंबा

पनवेल (प्रतिनिधी) खारघर टोलमाफीसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उभारलेल्या आंदोलनाला पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समिती आणि विविध संस्था-संघटनांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. त्यासंदर्भातील पाठिंब्याचे पत्र बुधवारी समितीचे अध्यक्ष विजय कडू आणि पदाधिकाऱ्यांनी आंदोलनाचे प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे बुधवारी सुपूर्द केले.

यावेळी पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीचे सरचिटणीस संजय कदम, उपाध्यक्ष निलेश सोनावणे, खजिनदार विजय पवार, प्रसिध्दी प्रमुख केवल महाडिक, ज्येष्ठ पत्रकार व सदस्य गणेश कोळी, मदन बडगुजर, प्रशांत शेडगे, सय्यद अकबर, बाळू जुमलेदार, विक्रम बाबर, हरेश साठे, लक्ष्मण ठाकूर, अनिल कुरघोडे, राजाराम नाचर, रत्नाकर पाटील, सुमंत नलावडे, नितीन कोळी, शैलेश जोशी, राजू गाडे, प्रविण मोहोकर, मयूर तांबडे, उरणचे पत्रकार घनश्याम कडू, अजित पाटील, अनंत नारंगीकर, राजकुमार भगत आदी उपस्थित होते.

खारघर टोलनाक्यामुळे विनाकारण पनवेल तालुक्यातील नागरिकांवर टोलचा नाहक बोजा बसू नये यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासनाकडे टोलमाफीची आग्रही मागणी धरली असून शासनदरबारी योग्य तो निर्णय न झाल्यास ११ जुलैपासून टोलमाफी मिळेपर्यंत खारघर टोलनाकाविरोधात आंदोलन करण्याचा पवित्रा आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतला आहे. त्यासंदर्भातील जनजागृतीही केली असून सहयांची मोहिम राबविली जात असून सोबतीने जनजागृती प्रचारवाहन तालुक्यातील विविध विभागात फिरून जनजागृती करत लोकांच्या भावना जाणून घेत आहे. खारघर टोलनाक्याविरोधात लोकांच्या तीव्र भावना व्यक्त होत असून आजपर्यंत नऊ हजारहून अधिक नागरिकांनी स्वाक्षरी मोहिमेत सहभाग घेवून या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला आहे.

पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीने दिलेल्या पाठिंब्याच्या पत्रात, राज्यात कॉंग्रेस आघाडीची सत्ता आहे व आमदार प्रशांत ठाकूर या आघाडी सरकारचे पनवेल विधानसभा मतदार संघातून आमदार म्हणून प्रतिनिधीत्व करीत असतानाही केवळ त्यांनी सर्वसामान्यांना नाहक भूर्दंड बसू नये याकरिता आंदोलनन उभारले आहे. सामान्य माणसासाठी त्यांनी घेतलेल्या आंदोलनाचा पवित्रा योग्य असुन, त्या आंदोलनास पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समिती जाहीर पाठिंबा देत आहे, असे म्हंटले असून समितीने आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांसाठी घेतलेल्या भुमिकेचे स्वागत केले असून नागरिकांना नाहक भुर्दंड सोसावा लागू नये याकरिता टोल बंदचा सर्वप्रथम आक्रमक पवित्रा घेवून त्या संदर्भातील जनजागृती करून जागरूक लोकप्रतिनिधी म्हणून आमदार प्रशांत ठाकूर यांनी काम केले असल्याचे पत्रात नमूद केले आहे. पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समिती बरोबरच उरण तालुका पत्रकार संघ, अखिल भारतीय ग्रामिण पत्रकार संघ, झुंझार युवा मंच उरण तसेच पनवेल सराफ ॲन्ड ज्वेलर्स असोसिएशन या व्यापारी संघटनेनेही खारघर टोलनाकाविरोधातील आंदोलनाकरिता आमदार प्रशांत ठाकूर यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.